**Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)**
UGC Approved Sr.No.64259
Vol - V | Issue-III | MARCH | 2018 | ISSN 2349-638x | Impact Factor 4.574

# कवितेचे रसग्रहण : स्वरूप व प्रक्रिया

**डॉ. संदीप कडू माळी,**
मराठी विभाग,
संत मुक्ताबाई कला व वाणिज्य महाविद्यालय,
मुक्ताईनगर. जि. जळगांव. ४२५३०६

अभिप्राय आणि रसग्रहण यातली सीमारेषा स्पष्ट करतांना अभिप्राय म्हणजे A Comment, view, opinion, meaning, sense अशा अर्थाने या नामाकडे पाहता येते. उदाहरणार्थ एखाद्या पाककृतीबद्दल अभिप्राय विचारला तर तो त्या पाककृतीच्या चवीच्या संदर्भात देण्याकडे बहुतेक कल दिसतो. कारण चांगलं अथवा वाईट किंवा चवदार अथवा बेचव इतकेच त्यात खरे पाहता अपेक्षीत असते. त्या पाककृतीची बनवण्याची पद्धत कधी विचारात घेतली जात नाही. पाककृतीचा आस्वाद घेतल्यानंतर आलेल्या चवीवरून तिच्या बनवण्याच्या पद्धतीचा अंदाजही बांधता येतो, पण तो नंतरचा भाग आहे. अथा*त इथे अभिप्राय म्हणजे फक्त एक कॉमेंट आहे. जिचे अस्तित्व क्षणभर आहे. रसग्रहणात मात्र व्यापकता येते. कारण रसग्रहणाला Appriciation, Judgement, Rise of Value या विविध अर्थाने ओळखले जाते. किंबहुना याच प्रकारचे अर्थाकरण तिथे अपेक्षीत असते. रसग्रहणात फक्त कौतुकच होते असे नाही तर रसग्रहणात सर्वच बाजुंनी विचार होतो. अर्थात या विचारांच्या व्याप्तीलाही मर्यादा आहे. त्या कलाकृतीच्या बाहेर रसग्रहणाचा विचार सहजी जात नसतो. रसग्रहण करीत असतांना एका विशिष्ट कलाकृतीला केंद्रीभूत मानून त्या कलाकृतीच्या सभोवतीला जे जे काही घटकमुद्दे दिसून येतात त्या सर्वांचा समावेश रसग्रहणात करावा लागतो. त्याबरोबरच कलाकृतीतील घटकांचा आणि त्या घटकांच्या अस्तित्वाचा विचारही महत्त्वाचा असतो.

काव्य म्हणजे भावनांचा उद्रेक. मनात खोलवर दडलेल्या आणि अत्यंत उत्स्फुर्तपणे बाहेर उचंबळून आलेल्या भावनांची परिणती ही काव्यात होते, हे सर्वकालीन सत्य आहे. साहित्याची निर्मिती ठरवून करता येत नाही. त्याला मानवी मनातील भावस्थितीचा आधार हा लागतोच. त्याशिवाय साहित्य हे वाचकाच्या अंत:करणापर्यंत पोहचत नाही. त्यात लेखकाचा साहित्यगत अनुभव महत्त्वाचा असतो. कवितेच्या बाबतीत बोलायचे झाले म्हणजे आकलन-आस्वाद-विवरण आणि चिकित्सा यातूनच कवी कोणत्याही अनुभवाची प्रतीती घेत असतो. कवीच्या अंत:करणातली सहजस्फुरणे, इच्छाशक्ती, बुद्धी आणि भावना त्याच्या नवनिर्माणाच्या पाठीशी असतात. त्याची ही निर्मिती म्हणजे त्याच्या व्यक्तिगत ईक्षणाचेच फल असते. कवी जीवनाची समीक्षा करत असतो आणि जीवनाची बिंबे-प्रतिबिंबे आस्वादकाला दाखवत असतो.[१] त्यामुळे कविता हा जीवनाशी निगडीत असलेला आणि जीवनाचे अधिक जवळून दर्शन घडविणारा साहित्यप्रकार आहे.

वाचक एखादी कविता वाचतो, अनुभवतो, त्यातल्या अर्थाला स्पर्शण्याचा प्रयत्न करतो, थोडक्यात ती आस्वादतो. वाचकाला ती कविता आवडते. त्याला त्यातून आनंद मिळतो. या आनंदाचे कारण जरी नेमकेपणाने सांगता येत नसले तरी वाचक मात्र एकुणच कवितेच्या प्रभावाखाली आलेला असतो. त्या आनंदामागे कवितेतील आशयात्मकता, स्वरूप अथवा लयतत्त्व किंवा शब्दरचना इत्यादींपैकी काहीही असू शकते. कारण त्या कवितेच्या वाचनातून आलेला काव्यात्मक अनुभव वाचकाच्या मानसिकतेला अधिग्रहीत करीत असतो. मानसिकतेशी जुळवणूक झाल्यानंतरच त्याला सौंदर्यदर्शन होते. हेच सौंदर्यदर्शन व्यक्त करीत दुसऱ्याला सांगणे म्हणजे रसग्रहण होय. रा.श्री.जोग यांनी रसग्रहणाची व्याख्या करतांना म्हटले आहे की, रसग्रहण म्हणजे रसिक वाचकाने दुसऱ्यांकरिता आस्वाद विषयाचे साकल्याने आणि सर्व अंगांनी केलेले सौंदर्यदर्शन. आस्वादनातून सौंदर्यप्रतिती हे रसग्रहणाचे व्यवच्छेदक लक्षण सांगता येईल.

भरताने रससूत्रामध्ये विभाव, अनुभाव आणि व्यभिचारी भाव यांच्या संयोगाला महत्त्व दिले आहे. हा संयोग त्याने पानाच्या विड्याच्या उदाहरणातून उलगडून दाखविला आहे. त्याच्या चर्वणातल्या वारंवारीतेतून ज्याप्रमाणे रस पाझरतो, तसाच कवितेच्या वारंवार वाचनातून कवितेतील अर्थाची विविध वलयं निर्माण होत जातात. एखाद्यावेळी कविला आपले म्हणणे सर्वसामान्यपणे न मांडता वेगळ्याशैलीतून मांडावेसे वाटते. तेव्हा काव्यात प्रयोग झाला असे आपण म्हणतो. रूपकात्मक काव्य हे याचीच निर्मिती आहे.

कवितेचे रसग्रहण करीत असतांना कवितेचे शिर्षक, कवितेचा विषय, कविचा परिचय, कवितेतील संवेदना, भावनात्मकता, काव्यात्म रूपक, काव्यसौंदर्य, काव्यगुण, लयबद्धता, कवितेतील वर्णनात्मकता आणि कवितेतील विविध दोषस्थळे इत्यादिंबाबत चिंतन व्हायला पाहिजे. "एका विशिष्ट कालखंडात केलेली काव्यनिर्मिती सर्वकाळी, सर्वस्थळी तंतोतंत लागू पडेलच असेही नाही. तिचे स्वरूप हे नेहमी प्रवाही व परिवर्तनशील असेच असते. स्थलपरत्वे, कालपरत्वे तिच्यात बदल झालेला आढळून येतो. जिथल्या तिथल्या स्थलकालाच्या विभिन्नतेशी ती अनुकुलक्षम झालेली दिसते. अपवादात्मक परिस्थितीत ती सर्वकाळी सर्वस्थळी चालतानाही आढळून येते. तिच्यावर स्थलकालाचा जसा प्रभाव असतो तसे वेगवेगळ्या विचारप्रवाहांचेही अधिक्य व नियमनही असते. तिचा प्राथमिक उद्देश निखळ मनोरंजन असला तरी ती वेळोवेळी समाजाला प्रबोधनाचे डोस पाजतानाही दिसून येते. वृत्ते, अलंकार, शब्दशक्ती, काव्यगुण, नवरस यांच्या अभ्यास आकलनाने कवी जन्मास येतो असे मुळीच नाही. कविता चांगल्याप्रकारे अवगत अंगीकृत करण्याची ती केवळ माध्यमे ठरतात. त्यांच्या अभ्यास आकलनाने उत्तम रसिक निर्माण होतात, कवी नाही."[२] कवितेचे रसग्रहणातून वाचकाला काव्यलेखनाचे ज्ञान नाही झाले तरी त्याला काव्याची उत्तम समज येणे महत्त्वाचे असते. काव्याची ही समज त्याला कवितेच्या खोलात घेऊन जाते. तेव्हा खरी कविता कळते.

कवितेत प्रतिमा आणि प्रतिके हाही एक महत्त्वाचा भाग असतो. रसग्रहण करतांना त्यांचा प्रामुख्याने उल्लेख आला पाहिजे. कवितेच्या रसग्रहणात एक लक्षात ठेवण्यासारखी बाब म्हणजे "कोणत्याही काव्यात येणारी प्रतिमा ही त्या काव्याचा आत्मा असते. प्रतिमा जर अस्सल व जिवंत असेल तर कवितेचे आयुष्यमान वाढते. ती जर निर्जीव असेल तर अल्पावधीतच कवितेचा मृत्यू होण्याचा धोका संभवतो. म्हणून कवितेतील प्रतिमा ही काव्यवैभवाच्या दृष्टीने खूप मोलाची असते."[३] कवितेच्या संदर्भात प्रतिमेचे वर्णन करतांना सुधीर रसाळ यांनी म्हटले आहे की, भाषेच्या परिणामामुळे वाचकाच्या मनात निर्माण होणारी संवेदनाचित्रे म्हणजे प्रतिमा. वस्तुचे तंतोतंत वर्णन करणारा शब्दसमुह त्या वस्तूचे वाचकाच्या मनात चित्र उमटवू शकतो. याला वाच्यार्थी प्रतिमा म्हणतात. काव्यात येणारे उपमा, रूपक, रूपकातिशयोक्ती यासारखे अलंकार म्हणजेही प्रतिमाच असतात. परंतु येथे वाचकाच्या मनात उमटणाऱ्या संवेदनचित्राला महत्त्व नसून दोन वस्तू उगर घटना यांतील साधर्म्य-वैधर्म्याला महत्त्व असते. आधुनिक अलंकारविचारात प्रतिमा ही संज्ञा कधी उपमानाला, कधी उपमेयाला, तर कधी दोहोंना मिळून वापरली जाते. त्याबरोबरच कविचे चरित्रा, त्याची काव्यविषयाबाबतची कल्पकता, भावनात्मकता यांचाही विचार महत्त्वाचा ठरतो. कवितेतील प्रतिमांइतकेच वृत्तांचेही महत्त्व आहे.

"बालकवींच्या कविता वाचताना सर्वप्रथम लक्षात येणारी गोष्ट म्हणजे, त्यांनी साध्या सोप्या मात्रावृत्तांचा आणि गेय अशा चालींचा उपयोग केला आहे. वर्णांच्या आणि शब्दांच्या पुनरूक्तीचा त्यांनी वापर केला आहे. बहुतांश कवितांमध्ये मृदू वर्णाचे उपयोजन आहे. बालकवींच्या विशिष्ट संवेदनशीलतेचा प्रत्यय येतो. उपमा-रूपक-उत्प्रेक्षासदृश प्रतिमा आणि वर्णांतून, शब्दांतून जाणवणारा नाद, यमके, चरणांतील आंदोलने, लय यांमुळे, बालकवींच्या कवितेला अनन्य असे रूप प्राप्त झाले आहे. वर्णांची, शब्दांची, अर्ध-चरणांची आवृत्ती आणि समांतरता, हे बालकवींच्या कवितेचे एक वैशिष्ट्य आहे. आनंदी आनंद गडे, इकडे तिकडे चोहिंकडे यात वर्णांची आवृत्ती दिसते. नभांत भरला, दिशांत फिरला, जगांत उरला यात समांतरता आहे. अशी अनेक उदाहरणे बालकवितंच्या कवितेत आढळतात. किंबहुना बालकवींच्या कवितेचे ते पोत आहे."[४] कवितेतली ही गेयता काव्यास्वादाला अत्यंत पोषक असते. कारण संगीत आणि काव्याचा आत्मा एकजीव असतो.

काव्यात संगीतगर्भ विचार असतात. त्यात सर्वत्र संगीत नसले तरी यमकादी अलंकारांचा वापर त्याला संगीताच्या जवळ नेतो. त्यामुळे त्यात गेयता येते. गेयतेमुळे काव्यातील गोडी वाढते. ते काव्य गाण्याच्या स्वरूपात एखाद्या चालीवर गाता येते. त्यामुळे रसिकप्रियता त्याला लाभते. कवित ही वृत्तबद्ध अथवा छंदबद्ध असली तर अधिकच तिची रसिकता वाढत असते. कारण तिथे नाद उत्पन्न होतो. या नादमयतेत लयबद्धता येते ती यमक अनुप्रास इत्यादी अलंकारांमुळेच. त्यामुळे काव्यातून अलंकारांच्या साह्यानेही एक सुंदर विचार अभिव्यक्त करायला वाव असतो. म्हणून रसग्रहणात या अलंकारांचा प्रमाणबद्ध वापर काव्यगत सौंदर्याच्या वृद्धीला कारक ठरत असतो.

कवितेत आत्मानुभूतीला महत्त्व असते. आत्मिक अनुभव हा कवितेचा अविभाज्य भाग आहे. किंबहूना कवितेचे रसग्रहण या आत्मिक अनुभवाशिवाय कुणालाही करणे अशक्यप्राय आहे. कारण कविने कविता लिहून ही वाचकाच्या हाती सोपवलेली असते. त्याने त्या कवितेतील प्रत्येक शब्दात आपले अंतर्मन व्यापलेले असते. आपली काव्याभिव्यक्ती ही रंजनाच्या पातळीवरच फक्त न ठेवता त्यातून आशयाची पखरण तो करीत असतो. म्हणून कविता ही त्या दोन ओळींच्या मध्ये म्हणजे इन बिटविन द लाईन्स म्हणतात तशी वाचावी लागते. कवितेतून शब्दांच्या पलीकडला अनुभव व्यक्त करण्याकडे कवीचा कल असतो. प्रतिभासंपन्न कवी हा आपल्या कवितेतून अनेक प्रश्न सोडून जात असतो. ते सगळे विविध प्रतिमा, प्रतिके तसेच काव्याच्या विविध घटकांद्वारे वाचकांच्या मनापर्यंत पोहचवत असतो. उत्तम वाचकाला त्यातल्या मर्मापर्यंत पोहोचावे लागते. त्यामुळे कवितेतून आत्मप्रत्यय घेतला तर खऱ्याखुऱ्या काव्यानंदाला अनुभवता येते. अन्यथा कविता दुर्बोध वाटायला लागते.

**संदर्भ**

१. हर्डीकर कल्याणी, महाराष्ट्र साहित्य पत्रिका, अंक क्र. ३६१, ऑक्ट-डिसें २०१७
२. दौंडे संतोष, कविता - लेख, अक्षरसंवाद, आक्टो -डिसे २०१७, पृ १८-१९
३. पावडे, व्यंकटी, साहित्यक्षुधा, वर्ष तिसरे, अंक चौथा, ऑक्टो-डिसें २०१७, पृ. ४८
४. डहाके, वसंत आबाजी, कवी आणि कविता, लोकराज्य, जून-जुलै २०११, पृ. ५१